श्रद्धेय सीतारामअप्पा बाबारामअप्पा एकलारे स्मृतिग्रंथ



# आधारवड



# सेवाकार्य समर्पण

(१२-१२-१९४१ ते २५-०८-२०२०)

* सेवार्थी *

श्री गुरू बुद्धिस्वामी मठ (लासिना) पूर्णा
श्री भीमाशंकर मठ संस्थान शिराढोण
ता. कंधार जि. नांदेड

* संस्थापक *

श्री बाबा गुरू हंम्पय्या स्वामी शांतिधाम आश्रम,
पूर्णा

* अध्यक्ष *

व्यापारी महासंघ, पूर्णा
स्था. सल्लागार समिती, शंकर नागरी सह.बँक, पूर्णा

* कार्याध्यक्ष *

श्री गुरू बुद्धिस्वामी शिक्षण प्रसारक संस्था, पूर्णा

* संचालक *

विद्या प्रसारणी सभा, पूर्णा
कृषि उत्पन्न बाजार समिती, पूर्णा
संत तुकाराम महाराज वारकरी संस्था, पूर्णा
भीमाशंकर हाऊसिंग सोसायटी, गोपाळ चावडी, नांदेड

* सदस्य *

शांतता समिती, पूर्णा
नगर परिषद, पूर्णा जि. परभणी

अनुराधा पब्लिकेशन्स, नांदेड

ISBN 978-93-82995-67-8

३०. **साधी राहणी उच्च विचार**

– डॉ. संतोष बाबुराव कुऱ्हे / ५३

३१. **सीतारामअप्पा एकलारे दानशूरतेचा कळस ...**

– प्रा. ई.आर. मठवाले / ५४

३२. **अविस्मरणीय अण्णा**

– प्रा. ब.सु.कानडे / ६०

३३. **मी पाहिलेला देवमाणूस**

– डॉ. भुताळे पि.व्ही. / ६१

३४. **मी अनुभवलेले अण्णा ...**

– श्री अरूण डुब्बेवार / ६६

३५. **श्री गुरू बुद्धिस्वामी परिवाराचा आधारस्तंभ कोसळला ...**

– डॉ. आदिनाथ इंगोले / ६७

३६. **मनाची श्रीमंती असणारे अण्णा ...**

– श्री बाळासाहेब कुलकर्णी / ६८

३७. **सर्वस्पर्शी समाजसेवेचा शिलेदार**

– डॉ. संतोष शिवराज चांडोळे / ७०

३८. **प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व**

– डॉ. शिवसांब कापसे / ७२

३९. **उत्तुंग व्यक्तिमत्वाचा सहवास**

– डॉ. सोमनाथ गुंजकर / ७३

४०. **सर्वांगिण विकासाचे महामेरू – अण्णा**

– डॉ. पुष्पा गंगासागर / ७६

४१. **येथे कर माझे जुळती ...**

– डॉ. संजय दळवी / ७७

४२. **माझ्या नजरेतील कर्मयोगी**

– डॉ. रवी बरडे / ७९

४३. **अप्पा आपण होतात ...**

– अश्विनी पांचाळ / ८३

४४. **विद्यार्थ्यांचे उर्जास्त्रोत अप्पा**

– नितीन सखाराम धुळे / ८४

# मी पाहिलेला देव माणूस...

**डॉ.भुताळे पी.व्ही.**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालय, पूर्णा

'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।'

या अभंगाच्या ओळीचा संपूर्ण अर्थाप्रमाणे ज्यांनी जीवन व्यतीत केले. समाजातील गरीब, रंजले, गांजले, दलित-पददलित, वंचित, बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षणरूपी वाघीणीचे दुध पाजून सक्षम बनविणारे व्यक्तिमत्व म्हणजे कै. सीतारामजी अप्पा एकलारे. ज्यांना आम्ही सर्व आण्णा म्हणत असत. सर्व विद्यार्थी त्यांना अप्पा म्हणत असत. मी.प्रा.डॉ. भुताळे पी.व्ही श्री गुरू बुद्धिस्वामी महाविद्यालयाचा पहिल्या बॅचचा विद्यार्थी. महाविद्यालयाची स्थापना जुन-१९८३ मध्ये झाली. महाविद्यालय कसले, इमारत, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी कुणीच नाही. प्राचार्य मनोहर सोनटक्के सरांनी देगलुर येथून बी.ए. व बी.कॉम. साठी २०-२५ मुले घेऊन आले होती. त्यात मी एक होतो. डॉ. वाघमारे साहेबांच्या रुग्णालयातच आमची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

विद्यार्थी म्हणून ३ वर्ष व अध्यापक म्हणून ३३ वर्ष असा माझा ३६ वर्षाचा संबंध या महाविद्यालयाशी असल्यामुळे या कालखंडात माझा आदरणिय, वंदनिय, पुजनिय, पितृतुल्य कै. सीतारामजी अप्पा एकलारे यांचा जवळून कुटूंबप्रमुख या नात्याने संबंध आला. आण्णाबद्धल एका शब्दात बोलायचे तर ते केवळ मनुष्यातील देव होते. मी देव कधी पाहिला नाही. परंतु वारकरी संप्रदायातील अनेक साहित्याचे वाचन केल्यामुळे असे वाटते की, 'देव पहावयासी गेलो, आणि देवची होवून गेलो'. म्हणजेच संसाररूपी सागरातील दुःख निवारण्यासाठी माणुस देवाची आराधना करतो, भक्ती करतो, उपासना करतो, नामचिंतन करतो पण सुख काही सापडत नाही. मनुष्याला हे माहित नाही की आपल्यातच देव आहे ते म्हणजे चांगले कर्म करा. फळाची अपेक्षा न करता कर्म करावे हे जसे गीतेत सांगितले त्याचप्रमाणे अण्णांनी कुठलाही मोह, अपेक्षा न ठेवता दुसऱ्याच्या हितासाठी, सुखासाठी, समाधानासाठी, प्रगती व उन्नतीसाठी आयुष्यभर कार्यरत राहीले. म्हणून त्यांच्यात मी देव पाहिला.

आदरनिय अण्णा हे दानशुर, धर्मवीर, कर्मवीर, व्यवहार निपूण व निष्णात होते. समाजाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, व्यापार व उद्योग, शिक्षण, आरोग्य या विविध अंगाने शाश्वत विकास व्हावा यासाठी अण्णांनी या सर्व क्षेत्रात एक कर्मयोगी म्हणून अहोरात्र कार्यरत राहीले. अतिशय साधी राहणीमान, निगर्वी, प्रेमळ, इतरांबद्धल आदर, स्नेह, जिव्हाळा ठेवणारे अण्णा हे सर्वच आपले मनुष्य जीवन सार्थक केले.